# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहिल्यानगर **P.S.(ठाणे):** अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0475 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/09/2025 17:29

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 28/01/2025
**Time Period (कालावधी):** पहर 4 **Date To ( दिनांक पर्यंत):** 28/01/2025
**Time From (वेळेपासून):** 11:44 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:59 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/09/2025 **Time (वेळ):** 16:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 002
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/09/2025 17:19 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** एम एस ई बी कार्यालय, भिंगार,ता जि अहिल्यानगर येथे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अलफैज नादीर कुरेशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1998

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | घर नं180, ईदगाह, कलनी, आलमगी,र, नागरदेवळे, ता जि अहिल्यान, अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | घर नं180, ईदगाह, कलनी, आलमगी,र, नागरदेवळे, ता जि अहिल्यान, अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8446589302

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अजय प्रल्हाद चाबुकस्वार | | | 1. एम एस ई बी कार्यालय, भिंगार, ,ता जि अहिल्यानगर, रा बु-हाणनग,र नागरदेवळे ता जि अहिल्यानगर,अहिल्यानगर कॅम्प पोलीस ठाणे,अहिल्यानगर, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):



Scanned with OKEN Scanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि. 04/09/2025

मी अलफैज नादीर कुरेशी, वय- 27 वर्षे, धंदा - इलेक्ट्रिशियन, राहणार - घर नं.180, ईदगाह, कॉलनी, आलमगीर, नागरदेवळे, ता. जि. अहिल्यानगर, मो.नं. 8446589302.

मी वरील ठिकाणचा रहिवाशी असुन मी इलेक्ट्रीशियनचे काम करून माझ्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

दिनांक 23/01/2025 रोजी मी माझ्या कामावर असताना दुपारी 02/00 वाजणेच्या सुमारास मला माझ्या आईने कॉल करून सांगितले की, एम ई सी बी चे साहेब लोक आलेले आहेत ते आपले लाईटीचे मीटर खोलत आहेत त्यावेळी मी माझ्या आईला सदरच्या लोकांकडे फोन देण्यास सांगितले त्यावेळी मी त्यांना म्हणालो की काय झाले..? त्यावेळी ते मला म्हणाले की, तुमच्या मीटर मध्ये छेडछाड केल्याचे दिसत आहे. त्यामुळे आम्ही टेस्टींगला ऑफिसला घेवुन जात आहे तुम्ही संध्याकाळी एम एस ई बी च्या ऑफिसला या.. असे म्हणुन फोन बंद केला त्यावेळी मी पुन्हा माझे आईला फोन केला तेव्हा मला समजले की, एम एस ई बी च्या दोन कर्मचा-यांनी माझ्या घराचे इलेक्ट्रीक मीटर जप्त करून नेले आहे. व त्यांनी त्यांचा मोबाईल नं. 8329652749 असा दिलेला आहे. त्यानंतर दुस-या दिवशी दि. 24/01/2025 रोजी सकाळी 09/30 वाजणेच्या सुमारास मी घरी असताना एम ई सी बी च्या दोन कर्मचा-यापैकी एक जण आमच्या घरी आला व त्यांनी मला सांगितले की तुमच्या मीटरला मागच्या बाजुला होल असुन काहीतरी छेडछाड झालेली आहे ते पुढे टेस्टींगसाठी पाठवावे लागेल तु मला ऑफिसला येवुन भेट असे म्हणुन निघुन गेला त्यावेळी मला समजले की त्यांचे नाव अजय चाबुकस्वार असुन त्यांनी माझे आईजवळ दिलेला मोबाईल नंबर त्यांचाच होता. त्यानंतर दुपारी 1 वाजणेच्या सुमारास मी भिंगार पोलीस स्टेशन येथे असलेल्या एम ई सी बी च्या ऑफिसमध्ये जावुन अजय चाबुकस्वार यांची भेट घेतली असता त्यांनी माझे कडे इलेक्ट्रिक मीटर परत लावण्याच्या मोबदल्यात माझ्याकडे 20,000 रूपये मागितले. परंतु मला त्यांना लाच देण्याची ईच्छा नसल्याने मी चौकशी करून दि. 27/01/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे आलो व पोलीस निरीक्षक छाया देवरे यांना भेटलो व त्यांना माझी लाचेचे संदर्भाने तक्रार असलेबाबत सांगितले. त्यावेळी देवरे मॅडम यांनी तेथे उपस्थित असलेल्या दोन शासकिय पंच, पोकॉ सुदुक यांची व माझी आपआपसात ओळख करून देवून सर्वासमक्ष माझी तोंडी तक्रार ऐकून घेतली. त्यानंतर लेखी तक्रार लिहून घेवून त्यावर मी, देवरे मॅडम व दोन पंचानी सहया केल्या. देवरे मॅडम यांनी एम एस ई बी कर्मचारी अजय चाबुकस्वार हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबत पडताळणी करायची ठरले. मी देवरे मॅडम यांना सांगितले की, लोकसेवक चाबुकस्वार हे नेहमी फिरतीवर असतात त्यांना फोन करून भेटण्याबाबत विचारणा करावी लागेल. त्यामुळे सर्वानुमते तक्रारदार कुरेशी यांच्या मोबाईलवरून लोकसेवक चाबुकस्वार यांना फोन करण्याचे ठरले तसेच सदरचा कॉल व्हाईस रेकॉर्डरमध्ये ध्वनिमुद्रित करण्याचे ठरले. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. कुरेशी यांनी त्यांचे मो.नं. 8446589302 या क्रमांकावरून लोकसेवक चाबुकस्वार यांचे मो.क्रं. 8329652749 वर कॉल करून स्पिकर ऑन करून बोलणे केले, त्यावेळी लोकसेवक चाबुकस्वार यांनी सांगितले की, ते सध्या घरीच आहे त्यावर तक्रारदार यांनी सांगितले की, दहा मिनिटात मुन्नाच्या दुकानावर येतो तुम्हाला भेटण्यासाठी, त्यावर तक्रारदार यांनी त्यास संमती दिली. त्यानंतर मला व पंचाना सुचना देवून व्हाईस रेकॉर्डर चालु करून देवुन तो माझ्या ताब्यात देवुन लोकसेवक चाबुकस्वार यांची भेट घेण्याकरीता ब्रम्हगिरी तलाव, आलमगीर, भिंगार येथील माझ्या घराजवळील मुन्नाच्या चहाच्या टपरी येथे 18/23 वा. सुमारास मला व पंच नं.1 शेकडे यांना माझेकडील ॲक्सीस मोटार सायकल क्रं. एम. एच. 16 डी. ई. 6042 ने रवाना केले. त्यावेळी आम्ही दोघे माझेकडील दुचाकी वाहनाने ब्रम्हगिरी तलाव, आलमगीर, भिंगार येथील



Scanned with OKEN Scanner

माझे घराजवळील मुन्नाच्या चहाच्या टपरी येथे गेलो. त्यावेळी मी माझ्या मोबाईल वरून लोकसेवक चाबुकस्वार यांच्या मोबाईल फोन लावला त्यावेळी लोकसेवक चाबुकस्वार मला म्हणाले, मुन्नाकडे देवुन टाका, त्यावर मी त्यांना म्हणालो, ऐकाना मी पैसे नाय आणले सोबत, तुम्ही या इकड दोन मिनिट बोलायचं होत, त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, तुम्ही बोलले ना दुपारी, तुम्हाला माहितीय ना काय हे काय नाय, त्यावर मी त्यांना म्हणालो की, पाच दहा मिनिट या फक्त इकड आपण भेटु लगेच जा तुम्ही, त्यावर लोकसेवक चाबुकस्वार बरं बरं, मुन्नाला सांग असे म्हणुन फोन बंद केला. त्यानंतर मी माझा मित्र मुन्ना यांच्याशी बोलत असताना लोकसेवक चाबुकस्वार हे तेथे आले. त्यावेळी मी लोकसेवक यांना म्हणालो, अजय चाबुकस्वार साहेब, कस करायच, काय करायचं, त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, मी म्हणल करून टाका, दोन पाच जातेत. त्यावर मी म्हणालो की, दोन पाच नाही ना जाऊ राहीले, किती पैसे म्हणले तुम्ही सकाळी मला. त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, किती वेळा सांगितल, तुम्ही तेवढच लावुन धरला, त्यावेळेस तुम्हाला पंधरा म्हणालो होतो ना, तेव्हाच करून टाकायला पाहिजे होते वरती नसती गेलो ना तेवढे वाचले असते तुमचे. मी म्हणालो की, एक अंदाजाने मला सांगा किती दयावे लागतील, वीस हजार दयावे लागतील का? त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, साहेबासंग बोलतो, उदया मी बोलतो. त्यावर मी म्हणालो, कोणाकड करावं लागेल आपल्याला ते. त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, काल ते साहेब होते ना त्यांना भेटाव लागेल, त्यावेळेस म्हणल होत काय बारा का पंधरा हजार होते भरून टाका म्हणल,अशी बोलणी झाल्यानंतर लोकसेवक चाबुकस्वार हे तेथुन निघुन गेले, त्यानंतर मी व पंच नं.1 शेकडे असे ला.प्र.वि कार्यालय अहिल्यानगर येथे परत आलो.

त्यानंतर पोनि देवरे मॅडम व दोन्ही पंचानी व्हॉईस रेकॉर्डरमधील माझेत व लोकसेवक चाबुकस्वार यांचेत झालेले संभाषण ऐकले सदर संभाषणावरून पोनि देवरे मॅडम व पंचांची खात्री झाली की, लोकसेवक चाबुकस्वार यांनी माझ्या घराचे इलेक्ट्रिक मीटर पुन्हा बसुन देण्यासाठी पंधरा हजार रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर मी पोनि देवेर यांना कळविले की, लोकसेवक चाबुकस्वार यांनी उदया साहेबांना भेटुन (हाताने पंधरा हजार रूपयेचा सांकेतिक ईशारा करून) दयावे लागतील असे सांगितले त्यामुळे आज रोजीची कारवाई तात्पुरती स्थगित करून उदया दि. 28/01/2025 रोजी सापळा कारवाई आयोजित करण्यात यावी, असे समक्ष कळविले. त्यानंतर सर्वानुमते सदरची कारवाई तात्पुरती स्थगित करून सदर सापळा कारवाई ही उदया दि.28/01/2025 रोजी सकाळी 10/00 वा आयोजित करण्याचे ठरले.

दिनांक 28/01/2025 रोजी सकाळी 10/00 वा चे सुमारास पोनि देवरे मॅडम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी, दोन पंच व सापळा पथक असे लाचलुचपत प्रतिबंधक कार्यालय, अहिल्यानगर येथे हजर झालो. तसेच सापळा पथकामध्ये नव्याने सामिल झालेले पोकॉ गायकवाड हे देखील कार्यालयात हजर झाल. त्यानंतर पोनि देवरे मॅडम यांनी मला लोकसेवक चाबुकस्वार यांना दयावयाची लाचेची रक्कम हजर करण्यास सांगितले असता, मी माझे बचतीमधील 15000/- रुपये, त्यात 500/- रुपये दराच्या 30 चलनी नोटा हजर केल्या. सदरच्या लाचेची रक्कम 15000/- रूपये नोटांचे नंबर लिहुन घेवुन त्यास पोकॉ गायकवाड यांनी अँन्थ्रॉसिन पावडर लावली व अँन्थ्रॉसिन पावडर व अट्राव्हायलेट दिव्याच्या गुणधर्माबाबत माहिती समजावुन सांगुन सदरची लाचेची रक्कम ही माझे पॅन्टच्या उजव्या बाजुचे खिशामध्ये ठेवुन दिली.

त्यानंतर एम. एस. सी. बी. कार्यालय, भिंगार येथे लोकसेवक चाबुकस्वार यांचे विरूध्द लाचेचा सापळा आयोजित करण्याचे ठरले. व्हाईस रेकॉर्डर चालु करुन माझे ताब्यात दिला. त्यानंतर मला व पंच नं. 1 श्री. शेकडे यांचेसह लोकसेवक चाबुकस्वार व त्यांच्या साहेबांची भेट घेण्याकरीता एम. एस. ई. बी कार्यालय, भिंगार येथे जाण्यासाठी माझेकडील मोटार सायकलने रवाना केले ती वेळ 11/44 वा. ची होती. आमचे मागोमाग, पोनि देवरे मॅडम, पंच नं. 02 श्री. चेमटे, पोना काळे, पोकॉ गायकवाड व पोकॉ सुद्रुक असे शासकिय वाहन क्रं. एम.एच-16-एन-0548 ने आलात. त्यानंतर मी व पंच नं. 1 असे माझेकडील मोटार सायकल एस पी ऑफिस मार्गे रोडने पुढे घेवून जावुन त्यानंतर भिंगार येथील एम. एस. ई. बी. ऑफिस कार्यालयाच्या समोर उभी केली. पोनि. देवरे मॅडम व सापळा पथक आल्याची खात्री झाल्याने मी व पंच नं.1 श्री शेकडे असे एम. एस. ई. बी. ऑफिस कार्यालयाच्या मध्ये लोकसेवक चाबुकस्वार व त्यांच्या साहेबांना भेट घेण्यासाठी गेलो असता सदर ठिकाणी लोकसेवक चाबुकस्वार हे हजर नसल्याचे दिसले. त्यानंतर मी कार्यालयातील एका कर्मचा-याला चाबुकस्वार यांच्या बद्दल विचारले असता त्यांनी ते कम्पलेटला गेले असलेबाबत सांगितले. त्यानंतर मी माझे मोबाईल वरून लोकसेवक चाबुकस्वार यांच्या मोबाईल वर फोन केला त्यावेळी मी त्यांना कार्यालयात आले असलेबाबत सांगितले त्यावेळी लोकसेवक चाबुकस्वार यांनी सांगितले की, मला वेळ लागेल तुम्ही कार्यालयातील रणसिंग साहेब यांना भेटा. त्यानंतर मी एम.एस.ई.बी कार्यालयातील कर्मचा-याला रणसिंग साहेब यांच्याबद्दल विचारण केली असता त्यांनी रणसिंग साहेब हे बाहेर असल्याचे सांगितले त्यावेळी मी सदर कर्मचा-यांकडुन लोकसेवक रणसिंग यांचा मोबाईल नंबर प्राप्त करून घेतला.



Scanned with OKEN Scanner

त्यांनतर मी माझे मोबाईल फोन वरून लोकसेवक रणसिंग यांच्या मोबाईल क्रमांक 7350738738 यावर फोन केला व त्यांना माझे घरातील इलेक्ट्रिक मीटर बाबत सांगितले त्यावेळी लोकसेवक रणसिंग म्हणाले, तुम्हाला मीटर ओपन करायला बोलावल होत, लॅबला जाणार आहे मीटर असे सांगितले. त्यावेळी मी रणसिंग यांना ऑफिसमध्ये थांबुन राहु का? असे विचारले असता त्यांनी सांगितले की, ऑफिसला थांबु नका, फोन केल्यावर या, असे म्हणुन त्यांनी फोन ठेवुन दिला. त्यानंतर मी माझे मोबाईल फोन वरून लोकसेवक चाबुकस्वार यांना फोन करून लोकसेवक रणसिंग यांच्या बरोबर झालेल्या संभाषणा बाबत सांगितले. त्यावेळी लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, तुम्हाला नगर ऑफिसलाच बोलावुन घेतील. त्यावर मी म्हणालो की, दयायचे का नाही दयायचे पैस त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, तुम्हाला म्हटल होत, आरिफ भैया सोबत बोलुन घ्या त्यावर मी त्यांना म्हणालो की, आरिफच काय आहे मधी, डायरेक्ट आपण पैसे देवु राहिलो ना त्यांना. त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, तुम्ही त्यांनाच फोन करायचा ना, त्यावर मी त्यांना म्हणालो की, तुम्ही नाही ना इथ, ते नाही इथ, पैस आणले होते, देवुन टाकले असते त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, बघतो मी, मी निवांत झालो का, स्वःताहुन फोन करतो, त्यावर मी म्हणालो, ऑफिसला थांबु का. त्यावर लोकसेवक चाबुकस्वार म्हणाले, थांबु नका, फोन काय करू नका, त्यांनतर मी व पंच नं.1 श्री शेकडे असे रवाना केले त्या ठिकाणी परत आलो.

त्यानंतर मी पोनि देवरे मॅडम यांना कळविले की, ''आपण लोकसेवक चाबुकस्वार व त्यांच्या साहेबांना भेट घेण्यासाठी भिंगार येथील एम.एस.ई.बी. कार्यालय येथे पाठविले होते. परंतु त्याठिकाणी लोकसेवक चाबुकस्वार हजर नव्हते. त्यावेळी मी त्यांना फोन करून पैसे घेवुन आलेबाबत सांगितले असता त्यांनी सांगितले की, मी फोन करतो निवांत झालो की, आफिसला थांबु नका, फोन पण करू नका, असे सांगितले. त्यामुळे लोकसेवक चाबुकस्वार यांनी माझेशी संपर्क केल्यास मी आपणास कळविल त्यानंतर पुढील कारवाई करणेबावत व आजची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करणेबाबत कळविले. त्यानुसार माझा सविस्तर जबाब घेवुन त्यावर मी, पोनि देवरे मॅडम व दोन्ही पंचांनी सहया केल्या त्यांनतर माझे सांगणेप्रमाणे पुढील कारवाई आयोजित करण्याचे ठरले व सर्वानुमते सदर सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्याचे ठरले. त्यानंतर पोनि देवरे मॅडम यांनी माझे खिशातील लाचेची रक्कम पोकॉ गायकवाड यांचे करवी ताब्यात घेवुन एका लिफाफ्यात ठेवून दिली.

त्यानंतर दि. 03/03/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयात येवुन पोनि देवरे मॅडम यांना कळविले की, लोकसेवक चाबुकस्वार हे लाईटच्या पोलवर पडल्यामुळे त्याचा पाय फ्रॅक्चर झालेला असल्याने ते सध्या सुट्टीवर आहेत. त्यामुळे पुढिल सापळा कारवाई लोकसेवक चाबुकस्वार हे त्यांच्या कामावर हजर झाल्यावर आयोजित करावी. त्यानुसार माझा सविस्तर जबाब घेवुन लोकसेवक चाबुकस्वार हे त्यांच्या कामावर हजर झाल्यानंतर पुढील कारवाई आयोजित करण्याचे ठरले.

त्यानंतर दि. 29/05/2025 रोजी मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अहिल्यानगर येथे समक्ष येवुन पोनि देवरे मॅडम व पंचाना कळविले की, लोकसेवक चाबुकस्वार यांनी आज पावेतो लाचेच्या पैशासंदर्भात हस्ते परहस्ते माझ्याशी संपर्क केला नाही. तसेच लोकसेवक चाबुकस्वार हे लाईटच्या पोलवरून पडल्याने त्यांचा पाय फ्रॅक्चर झाल्यामुळे लोकसेवक चाबुकस्वार यांनी एम.एस.ई.बी मधील नोकरी सोडुन दिली आहे. तसेच एम.एस.ई.बी. मधील कर्मचा-यांनी माझ्या घरातील लाईटचे मीटर पुन्हा बसवले आहे. त्यामुळे लोकसेवक चाबुकस्वार, बाहयस्त्रोत वायरमन हे माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारणार नाहीत याची मला खात्री झाली आहे. तरी आपण ही सापळा कारवाई पुर्णतः स्थगित करून दिनांक 28/01/2025 रोजी लाच मागणी पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक चाबुकस्वार यांनी माझे घराचे मीटर पुन्हा बसुन देण्यासाठी पंधरा हजार रूपये लाचेची मागणी करून ती स्विकारण्याची तयारी दर्शवली म्हणुन आज पावेतो झाले कार्यवाही वरून लोकसेवक चाबुकस्वार, बाहयस्त्रोत वायरमन यांचेविरोधात कायदेशीर कारवाई करावी. त्यानंतर सदरची कारवाई पुर्णतः स्थगित करण्यात आली.

तरी लोकसेवक अजय प्रल्हाद चाबुकस्वार, बाहयस्त्रोत वायरमन, एम एस ई बी कार्यालय, भिंगार, ता. जि अहिल्यानगर, रा बु-हाणनगर नागरदेवळे ता. जि. अहिल्यानगर यांनी दि. 28/01/2025 रोजी 11/44 ते 12/59 वा. चे दरम्यान एम एस ई बी कार्यालय, भिंगार, ता. जि. अहिल्यानगर येथे लाच मागणी पडताळणी कारवाई च्या वेळी पंच नं. 1 श्री शेकडे यांचे समक्ष लोकसेवक चाबुकस्वार यांनी माझेकडे माझ्या घराचे मीटर पुन्हा बसुन देण्यासाठी पंधरा हजार रूपये लाचेची मागणी करून सदरची लाच रक्कम स्वीकारण्याची तयारी दर्शविली म्हणुन माझी लोकसेवक चाबुकस्वार, बाहयस्त्रोत वायरमन, एम एस ई बी कार्यालय, भिंगार, ता. जि अहिल्यानगर यांचे विरूध्द फिर्याद आहे.



Scanned with OKEN Scanner

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

jagdish dipajirao mulgir(I (Inspector)) / **or** (किंवा)

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): No.(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

Alfaiz

**15. Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): jagdish dipajirao mu
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

पोलीस ठाणे अंमलदार
भिंगार कॅम्प पो.स्टे. अ.नगर



Scanned with OKEN Scanner